# मराठी (द्‌वितीय भाषा) अक्षरभारती इयत्ता दहावी
## इयत्ता दहावीच्या प्रस्तावित आराखड्यानुसार नमुना कृतिपत्रिका

**वेळ– ३ तास** **एकूण गुण– ८०**

### कृतिपत्रिकेसाठी सूचना

(१) सूचनेनुसार आकलनकृती व व्याकरण यामधील आकृत्या काढाव्यात.
(२) आकृत्या पेननेच काढाव्यात.
(३) उपयोजित लेखनातील प्रश्नांसाठी (सूचना, निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही. तसेच हे प्रश्न लिहून घेऊ नयेत.
(४) विभाग ५– उपयोजित लेखन प्र.५ (अ) (२) सारांशलेखन या घटकासाठी गद्य विभागातील प्र.१ (इ) अपठित उतारा वाचून त्या उताऱ्याचा सारांश लिहावयाचा आहे.
(५) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

### विभाग – १ : गद्य **18 Marks**

**पठित गद्य**

**प्र.१. (अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(१) कारण लिहा.** ०२

(i) लेखकाचे वडील त्यांना खेळात नेहमीच प्रोत्साहन देत असत कारण…

(ii) लेखकाच्या आई–वडिलांना आनंद वाटत असे कारण…

पुढच्या आयुष्यात क्रिकेट खेळाडू होण्याची खूणगाठ मी इथेच मनाशी बांधली. प्रॅक्टिस संपल्यावर चेंडू गोळा करू लागणे, दुसऱ्या दिवसासाठी ग्राऊंडवर पाणी मारणे इत्यादी कामांत मी ग्राऊंड्समनला आनंदाने मदत करत असे. हे सर्व होत असता, रात्रीचे ६ ते ८ वाजता माझे काका सर्व मुलांना एकत्र बसवून प्रार्थना शिकवत व अभ्यासाला बसवत.

त्यानंतर एक आनंदाची गोष्ट घडली. माझ्या वडिलांची बदली परत पुण्यास झाली. माझ्या आई–वडिलांना वाय. एम. सी. ए. मधील खेळाडूंकडून माझ्या खेळाबाबत स्तुतीपर उद्‌गार ऐकू येऊ लागले, ते ऐकून त्यांना आनंद वाटे. माझे वडील स्वत: व्हॉलीबॉल चॅम्पियन होते. त्यामुळे ते मला खेळात नेहमीच प्रोत्साहन देत. एकदा दुपारी त्यांना जेवणाचा डबा घेऊन गेलो असताना त्यांनी मला दुकानात नेले व सहा रुपयांस एक जुनी बॅट विकत घेऊन दिली. ती बॅट पाहून माझा आनंद गगनात मावेना. मी तसाच ती बॅट घेऊन मित्रांना दाखवत सुटलो. त्या वेळेस वडिलांचा मासिक पगार अवघा चोवीस रुपये होता. माझे वडील अभ्यास व शाळा यांबाबतीत फारच कडक असत. एकदा मी शाळा चुकवून ग्राऊंडवर क्रिकेटचा एक मित्रत्वाचा सामना पाहत बसलो होतो. वडील घरी आले तेव्हा त्यांनी मला पाहिले व संतापाने छड्या मारत शाळेत नेऊन बसवले. त्या क्षणापासून मी शाळा मात्र कधीच चुकवली नाही.

Sample Board Papers
Website : sampleboardpapers.com
YouTube : Sample Board Papers SSC Maharashtra

(२) का ते लिहा. ०२

(i) बाळ रडत होते कारण····

(ii) लेखकाने सुटकेसमधील 'पुलकित' शाल काढली कारण····

(३) **स्वमत**– ''शाल व शालीनता' यांचा पाठाच्या आधारे तुम्हांला कळलेला अर्थ स्पष्ट करा. ०३

**प्र.१. (आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

(१) **आकृती पूर्ण करा.** ०२

**काळानुसार कवितेची बदललेली रूपे**

→ ............. → ............. → ............. → .............

**कविता :** सुश्रुत, ओळखलंस मला? अरे, मी आहे कविता. आपली तर फार पूर्वीपासून चांगलीच ओळख आहे, नाही का? तुमच्या पाठ्यपुस्तकांतल्या सगळ्या कविता तुम्ही तालासुरांत म्हणता.

**सुश्रुत :** हो ताई! मला आठवतंय. 'ही आवडते मज मनापासुनी शाळा' आणि 'श्रावणमासी हर्ष मानसी' या माझ्या आवडत्या कविता.

**कविता :** छान हं. सुश्रुत, माझं रूप छोटंसं, आटोपशीर. मोजक्या शब्दांत मोठ्ठा आशय व्यक्त करणं हे माझं वैशिष्ट्य. यमक, अनुप्रास अशा शब्दालंकारांनी माझं बाह्यरूप आणि उपमा, उत्प्रेक्षा, रूपकासारख्या अर्थालंकारांनी माझं अंतरंग सजवून कवी मला अधिक आशयगर्भ करतात.

**सुश्रुत :** मॅडम नेहमी सांगतात कवितेची शब्दरचना अर्थपूर्ण व चपखल असते. कल्पनांचा सुंदर आविष्कार कवितेत असतो, हे बरोबर ना?

**कविता :** अगदी बरोबर! आणखी काय माहीत आहे सुश्रुत तुला?

**सुश्रुत :** ताई, मला असं वाटतं संगीतकारांनी स्वरसाज चढवला, की तुझं गाण्यात रूपांतर होतं, कारण तुला मी पाठ्यपुस्तकात वाचतो आणि सीडीमध्ये, चित्रपटात ऐकतोसुद्धा.

**कविता :** छान निरीक्षण आहे हं तुझं. बरं, मला एक सांग तुझ्या शाळेत मराठी दिन साजरा करतात का?

**सुश्रुत :** हो, करतात ना.

**कविता :** कोणत्या तारखेला करतात?

**सुश्रुत :** अंऽऽऽ, २७ फेब्रुवारीला.

**कविता :** अगदी बरोबर. तो कोणाचा जन्मदिवस आहे, माहीत आहे तुला?

**सुश्रुत :** नाही ग.

**कविता :** 'नटसम्राट' नाटकाचे लेखक वि. वा. शिरवाडकर म्हणजेच कवीवर्य कुसुमाग्रज यांचा. त्यांच्या 'विशाखा' या काव्यसंग्रहाला मानाचा 'ज्ञानपीठ' पुरस्कार मिळाला आहे.

**सुश्रुत :** खरंच?

**कविता :** संतकाव्यापासून पंतकाव्य, मध्ययुगीन काव्य, शाहिरी काव्य अशी वळणे घेत आधुनिक काळात मी मुक्त छंदाचे रूप धारण केले आहे.

Website : sampleboardpapers.com



YouTube :
Sample Board Papers SSC Maharashtra

(२) (i) **सहसंबंध जोडा.** ०२

(अ) लेखक वि. वा शिरवाडकर :: कवीवर्य : ☐

(आ) यमक : शब्दालंकार :: उत्प्रेक्षा : ☐

(ii) **आकृतिबंध पूर्ण करा.**

**कविता**

**कवितेचे रुप** → ..................

**कवितेची शब्दरचना** → ..................

(३) **स्वमत**– तुम्हांला आवडणाऱ्या कोणत्याही एका साहित्यप्रकाराची माहिती लिहा. ०३

## अपठित गद्य

**प्र.१. (इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** ०२

(१) **कोण ते लिहा.**

(i) रामेश्वरम बेटावरील इंग्रजी जाणणारा एकमेव माणूस– ☐

(ii) कलाम यांना वाचनासाठी उत्तेजन देणारे– ☐

(iii) रामनाथपुरमला जाण्यासाठी वडिलांकडे परवानगी मागणारे– ☐

(iv) रामेश्वरम येथील वर्तमानपत्रांचे वितरक– ☐

जलालुद्दीन फारसा शिकला नाही पण त्याने अब्दुल कलामना मात्र शिकण्यासाठी सदैव प्रोत्साहन दिले. रामेश्वरम बेटावर इंग्रजी जाणणारा तो एकटाच माणूस होता. त्यानेच अब्दुल कलामना नवनव्या वैज्ञानिक शोधांबद्दल, साहित्याबद्दल, आधुनिक उपचारपद्धतीबद्दल ओळख करून दिली. त्यांच्या गावात एस. टी. आर माणिकन् नावाचे एक माजी क्रांतिकारक राष्ट्रभक्त राहत होते. त्यांच्याकडे पुस्तकांचा संग्रह होता. त्यांनी कलाम यांना पुस्तक वाचण्यासाठी सदैव उत्तेजन दिले. शमसुद्दीन नावाच्या दूरच्या भावाचा कलामवर प्रभाव होता. तो रामेश्वरममध्ये वर्तमानपत्राचा वितरक होता. रेल्वेने पंबन गावाहून वर्तमानपत्रांचे गठ्ठे येत. पुढे शमसुद्दीन त्याचे वाटप करी. दिनमणी हे सर्वात लोकप्रिय तमीळ वृत्तपत्र होते. १९३९ मध्ये दुसरे महायुद्ध पेटल्यावर पंबनहून येणारी गाडी रामेश्वरमला थांबेनाशी झाली. चालत्या गाडीतून ते गठ्ठे फेकले जात. ते गोळा करण्याच्या कामात शमसुद्दीनला कलाम मदत करू लागला. अब्दुल कलामच्या आयुष्यातील ती पहिली कष्टाची कमाई! दुसरे महायुद्ध संपल्यावर रामेश्वरम सोडून जिल्ह्याच्या ठिकाणी, रामनाथपुरमला शिक्षण घेण्यासाठी कलामांनी वडिलांकडे परवानगी मागितली. वडील म्हणाले, ''अब्दुल, तुला मोठे व्हायचे असेल तर गाव सोडून शिक्षणासाठी बाहेर जायला हवे.'' शमसुद्दीन आणि जलालुद्दीन कलामबरोबर रामनाथपुरमला गेले. कलामने कलेक्टर व्हावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती. जलालुद्दीन म्हणाला, ''मनामध्ये नेहमी आशावादी, भविष्याबद्दल चांगलेच विचार आणत जा. त्यामुळे आपल्या विचारांच्या शक्तीचा भविष्यावर चांगला परिणाम होईल.''

Website : sampleboardpapers.com

(२) **परिणाम लिहा.** ०२

(i) दुसरे महायुद्ध पेटले.

(ii) कलाम वृत्तपत्रे गोळा करण्याच्या कामात मदत करू लागले.

YouTube : Sample Board Papers SSC Maharashtra

विभाग २ पद्य **16 Marks**

प्र. २. (अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.

(१) चौकटी पूर्ण करा. ०२

(i) सर्वकाळ सुखदाता– ☐

(ii) तात्पुरती तहान भागविणारे– ☐

(iii) अभंगात वर्णन केलेला, चंद्रकिरण पिऊन जगणारा पक्षी– ☐

(iv) पिलांना सुरक्षितता देणारे– ☐

जेवीं चंद्रकिरण चकोरांसी । पांखोवा जेवीं पिलियांसी ।
जीवन जैसे कां जीवांसी । तेवीं सर्वांसी मृदुत्व ।।
जळ वरिवरी क्षाळी मळ । योगिया सबाह्य करी निर्मळ ।
उदक सुखी करी एक वेळ । योगी सर्वकाळ सुखदाता ।।
उदकाचें सुख तें किती । सवेंचि क्षणें तृषितें होती ।
योगिया दे स्वानंदतृप्ती । सुखासी विकृती पैं नाही ।।
उदकाची जे मधुरता । ते रसनेसीचि तत्वतां ।
योगियांचे गोडपण पाहतां । होय निवविता सर्वेंद्रियां ।।
मेघमुखें अध:पतन । उदकाचें देखोनि जाण ।
अध:पातें निवती जन । अन्नदान सकळांसी ।।
तैसे योगियासी खालुतें येणें । जे इहलोकीं जन्म पावणें ।
जन निववी श्रवणकीर्तनें । निजज्ञानें उद्धरी ।।

(२) तुलना करा. ०२

| योगीपुरुष | पाणी |
|---|---|
| | |

(३) योगी पुरुषाचे श्रेष्ठत्व तुमच्या शब्दांत स्पष्ट करा. ०२

(४) ‘सर्वकाळ सुखदाता’ असे योगी पुरुषास म्हणण्याची कोणती कारणे असावीत, असे तुम्हांस वाटते? ०२

Website : sampleboardpapers.com

YouTube :



Sample Board Papers SSC Maharashtra

(आ) खालील दोन कवितांपैकी कोणत्याही *एका* कवितेसंबंधी दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कृती सोडवा :

| मुद्दे | 'अंकिला मी दास तुझा' *किंवा* 'स्वप्न करू साकार' | | |
|---|---|---|---|
| (1) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री – | | | 1 |
| (2) प्रस्तुत कवितेचा विषय – | | | 1 |
| (3) प्रस्तुत ओळींचा सरळ अर्थ लिहा – | 'अग्निमाजि पडे बाळू। माता धांवें कनवाळू॥' | 'हजार आम्ही एकी बळकट सर्वांचे हो एकच मनगट.' | 2 |
| (4) प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण – | | | 2 |
| (5) प्रस्तुत शब्दांचा अर्थ लिहा – | (*i*) काज –<br>(*ii*) सवें –<br>(*iii*) पाडस –<br>(*iv*) धेनू – | (*i*) विभव –<br>(*ii*) मंगल –<br>(*iii*) श्रम –<br>(*iv*) हस्त – | 2 |

**विभाग ३ – स्थूलवाचन** **6 Marks**

**प्र.३. खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** ०६

(१) सूर्यास्ताच्या दर्शनाने मनात निर्माण होणाऱ्या मानवी भावभावना शब्दबद्ध करा.

(२) 'आधी केले मग सांगितले', या उक्तीची यथार्थता स्पष्ट करा.

(३) पुढील मुद्द्यांच्या आधारे 'सग्वारो कॅक्टस' या विषयावर टीप लिहा.

(i) सग्वारो कॅक्टसचे दिसणे

(ii) सग्वारो कॅक्टसचे उपयोग

Website : sampleboardpapers.com
YouTube :
Sample Board Papers SSC Maharashtra

विभाग ४– भाषाभ्यास **16 Marks**

प्र.४. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती

(1) खालील वाक्याचा प्रकार ओळखा : 2

(i) तुझ्या शाळेत मराठी दिन साजरा करतात का ?

(ii) रनिंगपेक्षा देखील दोरीवरच्या उड्या मारा.

(२) वाक्यरूपांतर ०२

कंसातील सूचनेनुसार कृती करा.

(i) अबब! केवढा हा साप! (विधानार्थी करा.)

(ii) रोज व्यायाम करावा. (आज्ञार्थी करा.)

(३) वाक्प्रचार (कोणतीही दोन) ०४

खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यांत उपयोग करा.

(i) थक्क होणे–

(ii) भारावून जाणे–

(iii) खूणगाठ बांधणे,

प्र.४. (आ) (१) भाषिक घटकांवर आधारित कृती.

(१) शब्दसंपत्ती

(i) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा. ०१

(अ) नदी– (आ) माणूस–

(ii) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा. ०१

(अ) गुण ×

(आ) आशा ×

(iii) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा. ०१

(अ) ठरवलेले व्रत मध्येच सोडणे–

(iv) वचन बदला : ०१

(अ) गोष्ट (आ) कल्पना

Sample Board Papers
Website : sampleboardpapers.com
YouTube :
Sample Board Papers SSC Maharashtra

(२) **लेखननियमांनुसार लेखन**

खालील वाक्य लेखननियमांनुसार लिहा. ०२

(i) आमच्या हायस्कुलमध्ये दर शनिवारी चाचणी परिक्षा घेण्यात येत असे.

(ii) वाधीणीनं नाला पार करून बांबुच्या गंजीत पाय ठेवला.

(३) **विरामचिन्हे**

(१) खालील वाक्यांत योग्य विरामचिन्हांचा उपयोग करा. ०२

(i) केवढी उंच इमारत ही

(ii) मी कसे व्यक्त करणार

**विभाग ५ उपयोजित लेखन** **24 Marks**

**प्र.५. (अ) (१) पत्रलेखन** ०६

**'नवभारत विद्यालय' आयोजित**
**वक्तृत्व स्पर्धा**–२५ सप्टेंबर
कलानगर, गोरेगाव (पू), मुंबई–४०००६३
**परीक्षक**– श्री. सुबोध पवार
योगानंद सोसायटी, बोरिवली (प.),
मुंबई–४०००९२

विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने

वक्तृत्व स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून उपस्थित राहण्याची विनंती करा.

किंवा

वक्तृत्व स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून उपस्थित राहिल्याबद्दल आभार माना.

किंवा

(२) **सारांशलेखन**

**विभाग – १ गद्य विभागातील प्र.१ इ मधील अपठित उताऱ्याचा १/३ एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.**

Sample Board Papers
Website : sampleboardpapers.com
YouTube : Sample Board Papers SSC Maharashtra

प्र.५. (आ) खालील कृती सोडवा. (कोणतीही दोन) १०

(१) बातमीलेखन

| |
|---|
| २२ नोव्हेंबर २०१८<br>महिला टी–२०<br>क्रिकेट वर्ल्डकप स्पर्धेत भारतीय महिला<br>संघाचा उपांत्य फेरीत प्रवेश. |

वरील विषयावर समर्पक शब्दांत बातमीलेखन करा.

(२) खालील शब्दांवरून आकर्षक जाहिरात तयार करा.

- संगणक वर्ग
- खास सवलत
- काळाची गरज
- तंत्रज्ञानाशी मैत्री
- प्रवेश मर्यादित

(३) कथालेखन

खालील मुद्द्यांच्या आधारे कथालेखन करा.

दोन बोके–लोण्याचा गोळा मिळणे–वाटणीवरून भांडण–माकडाचे तराजू घेऊन येणे–वाटणी करून देण्याच्या निमित्ताने स्वत:च लोणी खाणे–दोघांच्या भांडणात तिसऱ्याचा लाभ.

प्र.५. (इ) लेखनकौशल्य. ०८

खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा.

(१) प्रसंगलेखन

| |
|---|
| 'दिव्यदृष्टी अंध विद्यालय' पुणे<br>'वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा'<br>दि. २० डिसेंबर<br>'अंध विद्यार्थ्यांचा अनुपम<br>कलाविष्कार सोहळा'<br>• वाद्यवादन • गायन • नृत्य |

वरील प्रसंगी तुम्ही उपस्थित होता अशी कल्पना करून या प्रसंगाचे लेखन करा.

Website : sampleboardpapers.com

YouTube :

Sample Board Papers SSC Maharashtra

(२) आत्मवृत्त




भाग – १

| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| १. | तू बुद्धी दे (प्रार्थना) – गुरू ठाकूर | १ |
| २. | संतवाणी– (अ) अंकिला मी दास तुझा–संत नामदेव (आ) योगी सर्वकाळ सुखदाता–संत एकनाथ | २ |
| ३. | शाल – रा. ग. जाधव | ७ |
| ४. | उपास – पु. ल. देशपांडे | १० |
| ❖ | मोठे होत असलेल्या मुलांनो... (स्थूलवाचन) – डॉ. अनिल काकोडकर | १५ |

भाग – २

| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| ५. | दोन दिवस (कविता) – नारायण सुर्वे | १७ |
| ६. | चुडीवाला – जयश्री रुईकर | १९ |
| ७. | फूटप्रिन्टस – डॉ. प्रदीप आवटे | २३ |
| ८. | ऊर्जाशक्तीचा जागर – डॉ. रघुनाथ माशेलकर | २८ |
| ❖ | जाता अस्ताला (स्थूलवाचन) – गुरुदेव रवींद्रनाथ टागोर | ३१ |

भाग –३

| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| ९. | औक्षण (कविता) – इंदिरा संत | ३३ |
| १०. | रंग साहित्याचे | ३६ |
| ११. | जंगल डायरी – अतुल धामनकर | ४२ |
| १२. | रंग मजेचे रंग उद्याचे (कविता) – अंजली कुलकर्णी | ४५ |
| ❖ | जगणं कॅक्टसचं (स्थूलवाचन) – वसंत शिरवाडकर | ४७ |

भाग –४

| अ. क्र. | पाठ/कविता, लेखक/कवी | पृ. क्र. |
|---|---|---|
| १३. | हिरवंगार झाडासारखं (कविता) – जॉर्ज लोपीस | ५० |
| १४. | बीज पेरले गेले – चंदू बोर्डे | ५२ |
| १५. | खरा नागरिक – सुहास बारटक्के | ५५ |
| १६. | स्वप्न करू साकार (कविता) – किशोर पाठक | ५९ |
| ❖ | व्युत्पत्ती कोश (स्थूलवाचन) | ६१ |
| ❖ | उपयोजित लेखन | ६८ |

*** As per reduced syllabus 2020 – 2021**

***Note: Only chapter is omitted.**

**Grammar & Writing Skill part is not**

**Omitted from above mentioned chapters.**

Website : sampleboardpapers.com
YouTube : Sample Board Papers SSC Maharashtra